# लहानग्यांसह प्रवास करणाऱ्या पुरुषांनाही मिळणार दिलासा

## स्वच्छतागृहात बाळाचे डायपर बदलण्याची सुविधा

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गादरम्यान आपल्या लहानग्यांसह प्रवास करणाऱ्या पालकांना असुविधेचा सामना करावा लागू नये, यासाठीं मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने अर्थात एमएमआरसीएलने दिलासा दिला आहे. मेट्रो रेल्वे स्थानकांना जोडलेल्या सर्व पुरुषांच्या स्वच्छतागृहांमध्ये पहिल्यांदाच लहान मुलांचे डायपर बदलण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही सुविधा उपलब्ध करणारी मेट्रो ३ पहिली मेट्रो ठरली आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झ दरम्यानच्या मेट्रो मार्गिकेच्या २६ स्थानकांवर उपलब्ध करण्यात येणार आहे. भारतातील कोणत्याही मेट्रो स्थानकांमध्ये लहान मुलांचे डायपर बदलण्यासाठी पुरुषांचे स्वच्छतागृह उपलब्ध नाही. सर्व स्थानकांमध्ये तिकीट काऊंटरच्या आतील बाजूस स्वच्छतागृह उपलब्ध होणार आहे, मात्र केवळ सांताक्रुझ येथे पुरुष आणि महिलांचे एक एक स्वच्छतागृह स्थानकांच्या बाहेरील बाजूस असणार आहे. विभक्त कुटुंब पद्धती तसेच एकल पालक किंवा विविध कारणांमुळे तसेच वडिलांसह प्रवास करणाऱ्या बच्चेकंपनीमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे अनेकदा मेट्रो प्रवासादरम्यान मुलांना डायपर बदलणे किंवा स्वच्छतागृहाचा वापर करण्यास अडचणी निर्माण होतात, म्हणूनच मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पुरुषांच्या स्वच्छतागृहात लहानग्यांसाठी सुविधा उपलब्ध केली होती.